8.11	**Pre & Post offer shareholding of the Public**	**Pre Offer[2]**	**Post Offer**	**Pre Offer[2]**	**Post Offer**
	Number	40,85,211	37,04,016	40,85,211	52,69,522
	In %	75.09%	52.12%	75.09%	74.14%

[1] Assuming full acceptance under the Open Offer.

[2] of Equity Share Capital of the Target Company prior to Offer and prior to issuance of Equity Shares on preferential basis.

Capitalized terms used in this announcement, but not defined, shall have the same meaning assigned to them in the PA, DPS and the Letter of Offer. All other terms and conditions of the Offer shall remain unchanged.

The Acquirers along with PACs accept the responsibility for the information contained in this Announcement and also for the obligations of the Acquirers along with PACs laid down in the SEBI (SAST) Regulations and subsequent amendments made there of.

A copy of this Post Offer Advertisement will also be available on the SEBI website at www.sebi.gov.in, BSE website at www.bseindia.com and at the Registered Office of the Target Company i.e. Shop No. 1&7, Ground Floor, Empress Chambers, Plot No. 89A & B, Sector No. 1, Opp. NKGSB Bank, Kandivali (West), Mumbai, Maharashtra – 400 067.

THIS ANNOUNCEMENT IS ISSUED BY MANAGER TO THE OFFER ON BEHALF OF THE ACQUIRERS ALONG WITH PACS

GYR Capital Advisors — CLARITY | TRUST | GROWTH

GYR Capital Advisors Private Limited
(Formerly known as Alpha Numero Services Private Limited)
CIN No.:U67200GJ2017PTC096908
428, Gala Empire, Near J B Tower, Drive in Road,
Thaltej, Ahmedabad, Gujarat – 380 054
Tel No.: +91-95375-94321
Email:yash.doshi@gyrcapitaladvisors.com
Website:www.gyrcapitaladvisors.com
Contact Person: Mr. Yash Doshi
SEBI Reg. No.: INM000012810

Place: Ahmedabad
FDate: June 24, 2022

Raka

आपल्यामागे महाशक्ती!



(पान १ वरून) गट एकसंध ठेवण्याचा प्रयत्न शिंदे करत असल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, या बैठकीत बंडखोर आमदारांनी निर्णयाचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना दिले. या बैठकीपूर्वी, शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून बंडखोर आमदारांचे मनोगत मांडले. गेली अडीच वर्षे आमच्यासाठी 'वर्षा'ची दारे बंद होती, असे सांगत आमदारांना अपमानास्पद वागणूक का देण्यात आली, असा सवाल त्यांनी या पत्रात केला आहे. या पत्राबरोबरच बंडखोर आमदारांची भूमिका मांडणारी शिरसाट यांची चित्रफीतही शिंदे यांनी ट्वीटरद्वारे प्रसृत केली आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या हस्तलिखित साहित्याच्या संवर्धनाचे काय?

उच्च न्यायालयाची राज्य सरकारला विचारणा; समिती फेररचनेतील विलंबाबाबत नाराजी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्य छपाईचा पाच कोटींचा कागद वापराविना

'लोकसत्ता'मध्ये २४ नोव्हेंबर २०२१ रोजी यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याची न्यायालयाने दखल घेतली.

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्तलिखित साहित्याच्या संवर्धनासाठी काय करत आहात, त्याचे संवर्धन कसे करणार, असा प्रश्न विचारून उच्च न्यायालयाने गुरुवारी राज्य सरकारला त्याबाबत दोन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. प्रकाशनाचे काम आणि त्यासाठी नियुक्त केलेल्या समितीची पुनर्रचना करण्यास झालेल्या विलंबाबाबतही न्यायालयाने या वेळी नाराजी व्यक्त केली.

'डॉ. आंबेडकर यांच्या साहित्य छपाईचा पाच कोटींचा कागद वापराविना', या 'लोकसत्ता'मध्ये प्रकाशित झालेल्या बातमीची न्यायालयाने दखल घेतली होती. तसेच या संदर्भात जनहित याचिका दाखल करून घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या महानिबंधकांना दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य प्रकाशनाचे काम ठप्प होणे, ही खेदजनक बाब असल्याचे मतही न्यायालयाने त्या वेळी नोंदवले होते. तसेच अ‍ॅड्. स्वराज जाधव यांची याचिकाकर्त्यांचे वकील म्हणून नियुक्ती केली होती. प्रकाशनाचे काम आणि त्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने आतापर्यंत काय केले, अशी विचारणा करून दोन्हींची सद्यःस्थिती प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करण्याचे आदेश दिले. समिती पुनर्गठित करण्याबाबत विचार करण्याची सूचना न्यायालयाने केली होती. त्यावर समिती नव्याने स्थापन केली जाईल, असे सरकारने आश्वासित केले होते.

'नव्या सदस्यांची नियुक्ती का नाही?'

जाधव यांनी व्यक्त केलेल्या शक्यतेची न्यायालयाने दखल घेतली. तसेच आंबेडकर यांचे हस्तलिखित साहित्य संवर्धित करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न हे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करण्याचे आदेश दिले. या कामासाठीच समिती नियुक्त करण्यात आली होती, मग समितीमध्ये नव्या सदस्यांची नियुक्त का करण्यात आली नाही? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.

'सध्या साहित्य एका छोट्या खोलीत'

डॉ. बाबासाहेबांच्या हस्तलिखित साहित्याचेही संवर्धन करणे गरजेचे असल्याचे जाधव यांनी न्यायालयाला सांगितले. सध्या हे साहित्य बॅलार्ड इस्टेट येथील जुन्या इमारतीतील छोट्या खोलीत ठेवण्यात आले आहे. तेथे त्याला वाळवी लागण्याची आणि ते कायमस्वरूपी नष्ट होण्याची शक्यता असल्याकडे जाधव यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. त्यावर हे साहित्य मोठ्या जागेत हलवण्याचे काम सुरू असल्याचा दावा कंथारिया यांनी केला.

राज्यात पावसाळी स्थिती कायम

दक्षिण कोकणात जोरधारा; मुंबई मात्र कोरडी

छाया : अमित चक्रवर्ती



मुंबई आणि उपनगरांत...

मुंबई आणि उपनगरांत दोन-तीन दिवस हलक्या आणि मध्यम पावसाची सुरुवात झाली होती; पण गुरुवारी दिवसभर कडक उन पडले होते. परिणामी, मुंबईकरांना पुन्हा उन्हाच्या झळा सोसाव्या लागल्या.

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे, मुंबई : राज्यातील सर्वच विभागांत पुढील तीन ते चार दिवस पावसाळी स्थिती कायम राहणार आहे. दक्षिण कोकणामध्ये या काळात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाण्यात तुरळक भागांत हलका ते मध्यम पाऊस, तर पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील घाट विभागात काही भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भातही काही भागांत पुढील दोन दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

अरबी समुद्रातून सध्या काही प्रमाणात बाष्पयुक्त वारे वाहत असल्याने गेल्या आठवड्यापासून राज्यात पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. दक्षिण कोकणामध्ये गेल्या तीन ते चार दिवसांपासून काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे. मुंबई आणि ठाण्यातही पावसाची हजेरी आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्याच्या घाट विभागातही काही भागांत जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. सध्या बहुतांश भागांत हलका पाऊस होत असून, पावसाळी स्थिती कायम आहे.

पुढील चार दिवसांत...

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार मुंबई, ठाणे, पालघर आदी भागांमध्ये तीन ते चार दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दक्षिण कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांत तीन ते चार दिवस काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज आहे, रायगड जिल्ह्यात २५, २६ जूनला पावसाचे प्रमाण अधिक राहणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, नाशिकमध्ये पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सातारा आदी जिल्ह्यांत घाट विभागांत दोन ते तीन दिवस काही प्रमाणात पाऊस असेल. मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, परभणी आदी भागांत, तर विदर्भात जवळपास सर्वच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

शक्तिपरीक्षा विधानसभेतच

(पान १ वरून)

भवनाच्या प्रांगणात आल्यावर या आमदारांना आसाम किंवा गुजरातची मंडळी मार्गदर्शन करण्यासाठी नसतील, असा टोलाही पवारांनी लगावला.

संजय राऊत यांचे समर्थन

गुवाहाटीला गेलेल्या शिवसेनेच्या आमदारांनी इथे यावे, मग महाविकास आघाडीमधून बाहेर पडण्याचा विचार केला जाईल, या शिवसेने नेते खासदार संजय राऊत यांच्या विधानाचे शरद पवार यांनी समर्थन केले. जे काही बोलायचे ते इथे येऊन बोला, असे राऊत यांचे म्हणणे आहे, असे पवार यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जे शिवसेनेचे आमदार बाहेर गेले आहेत, त्यापैकी काहीजण वेगवेगळ्या तपास यंत्रणांच्या चौकशीमुळे तिकडे गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पवार यांनी सांगितले.

भुजबळांच्या बंडानंतर काय झाले...

शिवसेनेतून जे आमदार आता बाहेर गेले आहेत, ते उद्या निवडणुकीत पराभूत होतील, असे भाकित शरद पवार यांनी केले. त्यासाठी त्यांनी एकेकाळी छगन भुजबळ यांनी शिवसेनेत केलेल्या बंडाची आठवण करुन दिली. त्यावेळी भुजबळ १५-१६ आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडून काँग्रेसमध्ये आले होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत एकाचा अपवाद वगळता सर्व पराभूत झाले होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेलेल्या आमदारांची निवडणुकीत तशीच गत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, त्यांनी सांगितले.

सरकार वाचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न – अजित पवार

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा असून, सरकार वाचविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे मुख्यमंत्री ठाकरे यांच्याबरोबर आहे. तसेच आमदारांच्या निधीवाटपात पक्षपात केल्याच्या आरोपाचा त्यांनी इन्कार केला. सध्या जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यावर उद्धव ठाकरे मात करतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. सरकार टिकवण्याची जबाबदारी तिन्ही पक्षांची आहे, त्यामुळे संजय राऊत यांनी जे वक्तव्य केले त्यावर आम्हाला टीका करायची नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

बेकायदा सावकारी करणारा जेरबंद

पुणे : भावावर औषधोपचार करण्यासाठी घेतलेल्या ३० हजार रुपयांच्या कर्जावर तब्बल एक लाख रुपयांचे व्याज मागत कुटुंबातील व्यक्तीला जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या सावकाराला पोलिसांनी जेरबंद केले आहे. न्यायालयाने त्याला २७ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

सतीश बन्सिलाल भाटी (वय ५४ रा. भवानी पेठ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. फिर्यादी तरुणाने भावाच्या औषधोपचारासाठी भाटी याच्याकडून दरमहा १५ टक्के व्याजदराने ३० हजारांची रक्कम घेतली होती. कर्ज घेताना दुचाकीची कागदपत्रे आणि दोन धनादेश भाटीला दिले. आरोपीने साथीदारासह तरुणाच्या घरात शिरून २२ महिन्यांचे व्याज आणि मूळ अशा एक लाख २९ हजारांची मागणी केली. रक्कम न दिल्यास कुटुंबीयांना जिवे मारण्याची धमकी देत मारहाण केली. भाटीने तरुणाने दिलेल्या धनादेशाद्वारे १९ हजार रुपये काढूनही घेतले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर युनिट एक शाखेने आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्या दुकानासह घरामध्ये ६४ धनादेश, बँकेचे १६ पासबुक, मोबाइल असा ऐवज जप्त करण्यात आला. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता, त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

TATA
टाटा पॉवर
दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई - ४००००१.

जाहीर सूचना

असे अधिसूचीत करण्यात येते की, भारत सरकारने (एमओईएफसीसी) त्यांच्या दिनांकित २४.११.२०१५ पत्र क्र. एफ नं. ११-१९/२०१४-आयए-III द्वारा "२२० केव्ही कलवा-सालसेट ट्रान्समिशन लाइन (विद्यमान ११० केव्ही लाइनचे आवर्धन)" च्या टाटा पॉवर प्रकल्पाकरिता सीआरझेड समाशोधनास एकमताने मंजुरी दिली आहे. भारत सरकारने (एमओईएफसीसी) त्यांच्या दिनांकित १३.१२.२०२१ पत्र क्र. ६-एमएचबी-६१/२०१४-बीएसओ/९००६ द्वारा महाराष्ट्राच्या ठाणे व मुंबई जिल्ह्यातील अ‍ॅप्रोच रोड व २२० केव्ही कलवा-सालसेट ट्रान्समिशन लाइन टाकण्याकरिता ३.७४९६ एचए. वन क्षेत्र (खारफुटी)च्या अपवाहनाच्या टाटा पॉवर प्रकल्पाकरिता तत्त्वतः (स्टेज-I) मंजुरी दिली आहे. माननीय उच्च न्यायालयाने, २०२२च्या डब्लूपी नं. १२०७ यामध्ये, त्यांच्या दिनांकित ०२.०३.२०२२ आदेशाद्वारा खारफुटीमधील अ‍ॅप्रोच रोड व २२० केव्ही कलवा-सालसेट ट्रान्समिशन लाइन टाकण्याकरिता प्रकल्प आणि पब्लिक इंटरेस्ट प्रोजेक्टच्या माध्यमातून तिच्या बफर झोनच्या निष्पादनास टाटा पॉवरला मंजुरी दिली आहे. याअधिक, महाराष्ट्र सरकारने (वन विभाग) दिनांकित २१.०६.२०२२ ऑर्डर नं. डेस्क-१०/एफसी/पी.एन.३१/१३-१४/ ओ.एन.१६०/२०२२-२३ द्वारा अ‍ॅप्रोच रोड व २२० केव्ही कलवा-सालसेट ट्रान्समिशन लाइन टाकणे यासंबंधित प्रकल्प कामाच्या निष्पादनास अनुमती दिली आहे.
वन अपवाहनांतर्गत सविस्तर तपशील याखाली देण्यात आला आहे :

अनु. क्र.	गावाचे नाव	सीटीएस नं. / सर्व्हे नं.	एचए.तील एरिया	विधि दर्जा
१	ऐरोली	१३६, १३७, ३००	०.९३९०	आरक्षित वन (खारफुटी)
२	मुलुंड	१३२७, १३२०ए/१९, १३२०ए/१८/४, १३२०ए/१७, १३२०ए, १२८०, १३१९पीटी. १३१८पीटी.	२.७३५६	
३	नाहूर	७९५/१७, ७९५/२७	०.०७५०	
	एकूण		३.७४९६	

वर नमूद केलेल्या मंजुरी पत्रे / आदेशाच्या प्रती **https://www.tatapower.com/sustainability/natural-capital/compliance.aspx** या टाटा पॉवरच्या वेबसाइटवर सुद्धा उपलब्ध आहेत.

स्थळ : मुंबई
तारीख : २२.०६.२०२२

स्वाक्षरी/-
प्रदीप सावंत
मुख्य - ट्रान्समिशन प्रोजेक्ट्स

भारतीय स्टेट बँक

प्राधिकृत अधिकारी तपशील :
नाव : श्री. बी. व्ही. रंगधाम
सहा. महाव्यवस्थापक

शाखेचा पत्ता : १ला मजला, डी. क्र. ३-४-१०१३/ए, १ला मजला, सीएसी, टीएसआरटीसी बस स्टेशन, काचिगुडा, हैदराबाद
ई-मेल आयडी : sbi.18359@sbi.co.in

जोडपत्र-IV ए
(नियम ८(६) आणि ९(१) ची तरतूद पाहा)

ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमावली, २००२च्या नियम ८(६) आणि ९(१)च्या तरतुदींसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायजेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत बँकेकडे भारित/ गहाण असलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री

याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषतः कर्जदार/ हमीदार/ गहाणदार यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता भारतीय स्टेट बँक, सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण ठेवण्यात/ भारित करण्यात आल्या होत्या. मालमत्तेचा ताबा भारतीय स्टेट बँक, सुरक्षित धनको यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे घेण्यात आला असून **मे. बी.एस.लि.** त्यांचे प्रतिनिधित्व करीत असलेले व्यवस्थापकीय संचालक, १०३ डी ब्लॉक, ट्रेण्डसेट व्हॅली व्ह्यू, रोड क्र. ६, बंजारा हिल्स हैदराबाद, तेलंगणा आणि **हमीदार १) श्री. राजेश अगरवाल, २) श्री. दिलीप सत्यनारायण अगरवाल, ३) मे. अगरवाल डेव्हलपर्स, ४) मे. अगरवाल रियल्टी डेव्हलपर्स** यांच्याकडून भारतीय स्टेट बँक, सुरक्षित धनको यांना **१५.०६.२०१७** अनुसार **रु. १५१२,९६,२३,८३२.१६ (रुपये एक हजार पाचशे बारा कोटी शहाण्णव लक्ष तेवीस हजार आठशे बत्तीस आणि सोळा पैसे मात्र) + व्याज + भारवजा त्यानंतर केलेला भरणा + प्रासंगिक खर्च,** शुल्क किंमत इत्यादींच्या वसुलीसाठी १३.०७.२०२२ रोजी **'जसे आहे जेथे आहे', 'जे आहे जसे आहे'** आणि **'जसे आहे तसे आहे तत्त्वावर'** १३.०७.२०२२ रोजी करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

१. मालमत्ता आयडी एसबीआयएन२००००७७३२७७०

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील वांद्रेचा नोंदणीकरण उपजिल्हा, जिल्हा मुंबई उपनगरमधील गाव कोळेकल्याण, तालुका अंधेरीच्या सीटीएस क्र. ४२०७ (भाग) वरील नमूद इमारतीच्या तळमजल्यावरील स्टेक कार पार्किंग सिस्टीममधील ३ कार पार्किंगच्या जागेसह पिनॅकल कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. १९ (ए विंग)च्या ३ऱ्या मजल्यावरील मोजमाप ३७०२ चौ.फू. चटई क्षेत्र (३४४.०५ चौ.मी.शी समतुल्य)च्या कार्यालयीन जागेचा धारण केलेला युनिट क्र. ३०२ असलेला सर्व जे **मे. अगरवाल रियल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या नावे कागदपत्र क्र. २९२४/२०१४ दिनांकित ०२.०५.२०१४ अन्वये नोंदणीकृत असलेले आणि सीमा पुढीलप्रमाणे : उत्तर :** नमूद फ्री सेल जागेचा भाग, **दक्षिण :** २४ मी. रुंद रस्ता, **पूर्व :** मस्जिद, **पश्चिमेस :** आरए ५ (भाग), ६, ७ आणि ८ (भाग) म्हणून पूर्वी माहीत असलेल्या नमूद क्षेत्राचा फेरफार केलेला फ्री एरिया.

राखीव मूल्य, इरठेचा तपशील आणि ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ

अ. क्र.	लिलाव करण्यात येणारी मालमत्ता	लिलावाचा दिनांक आणि वेळ	राखीव मूल्य ज्याच्या खाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही	इसारा रक्कम ठेव (रु.मध्ये)	बोली वाढ (रु.मध्ये)
१	मालमत्ता क्र. १	१३.०७.२०२२ स. ११.०० ते दुपारी १२.०० वा.	१०,१०,००,०००.००	१,०१,००,०००.००	१०,००,०००.००

बोली अर्ज प्राप्त करण्यासाठी शेवटचा दिनांक १२.०७.२०२२ रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत.
मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक आणि वेळ: पूर्वपरवानगीसह **१२.०७.२०२२** पर्यंत कोणत्याही दिवशी **स. ११.०० वा.पासून सायं. ०४.०० वा.पर्यंत.**

इरठे भरणा : इच्छुक बोलीदारांनी त्यांची नोंदणी **https://ibapi.in** इंडियन बँक्स ऑक्शन प्रॉपर्टीज इन्फॉर्मेशन (आयबीएपीआय) पोर्टल (**https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp**) वर ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी करणे गरजेचे आहे. बोलीदारांनी त्यांची नोंदणी लिलावाच्या दिनांकापूर्वी पुरेसा वेळ पूर्वी करणे आवश्यक आहे कारण बोलीदारांच्या नोंदणीसाठी किमान तीन दिवसांचा कालावधी लागतो. इच्छुक बोलीदारांनी आयबीएपी पोर्टलवरील आयबीएपी वॉलेटमध्ये त्यांच्या बँकेच्या खात्याद्वारे इरठेचा भरणा करावा.

पाहणी आणि कोणत्याही स्पष्टीकरणासाठी इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकारी वजा साहाय्यक महाव्यवस्थापक श्री. बी. व्ही. रंगधाम, मोबाइल क्र. ९०१०४४३८०० किंवा बँकेचे मान्यताप्राप्त रिझोल्यूशन एजन्ट मे. तिरुमला फायनान्शियल सर्व्हिसेस यांच्याशी मोबाइल क्र. ९९४८७३९९३३, ९७०१९३३२४४ किंवा ९९८९८२२३४५ वर संपर्क करता येईल.

टीप : ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी थकबाकीचा पूर्ण परतावा न केल्यास उपरोक्त नमूद केलेल्या दिनांकाला मालमत्तेचा ई-लिलाव विक्री ठेवण्याबाबत उक्त कर्जाच्या कर्जदार जामीनदारांना सदर सूचना देण्यात येत आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या संकेतस्थळ (ए) **'http://www.sbi.co.in'** (बी) **https://ibapi.in** वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

दिनांक : २०.०६.२०२२
ठिकाण : हैदराबाद

सही/-
प्राधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक, एसएएमबी-II, हैदराबाद.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
मुंबई - 022-26592264

TENDER NOTICE

Mahila Arthik Vikas Mahamandal (MAVIM), A Government of Maharashtra Undertaking, invites Expression of interest from Human Resource Management Cum Placement agency/ Organization.

For detail document, interested bidders should visit on portal www.DevNetJobsIndia.org

All rights are reserved with Managing Director.

Last Date & Time for submission of Tenders: Till 12th July 2022, before 5.00 pm

Sd/-
Managing Director,
MAVIM, Mumbai

Nashik Municipal Smart City Development Corporation Ltd.
CIN : U93090MH2016SGC285193
E-mail : ceo@nashiksmartcity.in; Tel. : 0253-2518833

Tender Publishing Notice Advertisement
E-Tender No. : NMSCDCL/43/2022-23

NMSCDCL is publishing tender "Request For Proposal(RFP) for Establishing and Maintenance of Smart School in Nashik".
Tender publishing date is **22.06.2022,** Pre-bid meeting is on **28.06.2022.**
Last date of online submission of Bids is **13.07.2022 up to 05.30 PM.**
The detailed notice inviting tender available on **www.mahatenders.gov.in**.

Sd/-
Chief Executive Officer
NMSCDCL

क्रॉम्पटन
क्रॉम्पटन ग्रिव्हज् कंझ्यूमर इलेक्ट्रीकल्स लिमिटेड
सिआयएन : एल३१९००एमएच२०१५पीएलसी२६२२५४
नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : टॉवर ३, पहिला मजला, ईस्ट विंग, इक्युनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७०.
फोन : +९१-२२-६१६७ ८४९९ फॅक्स : +९१-२२-६१६७ ८३८३
ई-मेल : crompton.investorrelations@crompton.co.in वेबसाईट : www.crompton.co.in

८वी वार्षिक सर्वसाधारण सभा
व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर दृकश्राव्य माध्यमातून आयोजित (ओएव्हीएम)

याद्वारे सूचना दिली जाते की कोविड-१९ महामारीच्या उद्रेकाच्या दृष्टीकोनातून, क्रॉम्प्टन ग्रिव्हज कंज्युमर इलेक्ट्रीकल्स लिमिटेड ("दि कंपनी") च्या सदस्यांची ८ वी वार्षिक सर्वसामान्य सभा (एजीएम) ही कंपनी कायदा, २०१३ च्या लागू होणाऱ्या सर्व तरतुदी आणि त्या अंतर्गत तयार केलेले नियम, सूचनेमध्ये निश्चित केल्याप्रमाणे सामान्य आणि विशेष व्यवसायांचे व्यवहार करण्यासाठी मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स द्वारे जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांकित ५ मे, २०२०, सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, सामान्य परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२० आणि सामान्य परिपत्रक क्र. ०२/२०२१ दिनांकित १३ जानेवारी, २०२१ आणि सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२२ दिनांकित ५ मे, २०२२ सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी परिपत्रक') द्वारे जारी केलेल्या १२ मे, २०२० आणि १५ जानेवारी, २०२१ आणि १३ मे, २०२२ दिनांकित परिपत्रकाच्या अनुपालनाने शुक्रवार, २२ जुलै, २०२२ रोजी दुपारी ३.०० (आयएसटी) वाजता व्हिडिओ कॉन्फरेन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल साधने (ओएव्हीएम) द्वारे आयोजित केली आहे.

वरील परिपत्रकांशी अनुपालनाने, आर्थिक वर्ष २०२१-२२ साठीच्या वार्षिक अहवालासह एजीएमच्या सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती ज्या सदस्यांचे इमेल पत्ते कंपनी/डिपॉजिटरी सहभागींसोबत नोंदणीकृत/उपलब्ध असतील त्यांच्या इमेल पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवले जातील. एमसीए परिपत्रक आणि सेबी परिपत्रकानुसार, कोणत्याही सदस्याला एजीएमच्या सूचनेच्या आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रति पाठवल्या जाणार नाहीत.

नोंदणी करण्याची/इमेल पत्ता अद्ययावत करण्याची पध्दत - डिमटेरीअलाइज पध्दतीने भाग धारण करणाऱ्या सदस्यांना, त्यांच्या डिपॉजिटरी सहभागींद्वारे त्यांच्या संबंधित डिपॉजिटरीजसोबत इमेल पत्ता आणि मोबाईल क्रमांक नोंदणी करण्याची विनंती केली जाते. भौतिक मोडमध्ये भाग धारक करणाऱ्या सदस्यांना ISR -1 फॉर्म भरुन त्यांचे इमेल अ‍ॅड्रेसेस आणि मोबाईल क्रमांकाची माहिती कंपनी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ("आरटीए"), केफइन (KFin) टेक्नोलॉजिज लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२, गाचीबावली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रामगुडा, सेरीलिंगामपल्ली, हैदराबाद - ५०० ०३२, दूरध्वनी - +९१ ०४०-६७१६२२२२, फॅक्स - +९१ ०४०-२३४३११५१, इमेल - einward.ris@kfintech.com, वेबसाईट - www.kfintech.com ला देण्याची विनंती केली जाते.

एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल हा www.crompton.co.in कंपनीच्या वेबसाईटवर, स्टॉक एक्सचेंजेस (एनएसइ आणि बीएसइ) ची वेबसाईट आणि https://www.evoting.nsdl.com एनएसडीएलची वेबसाईट वर उपलब्ध असेल.

इ-वोटींगद्वारे मत देण्याची पध्दत - सदस्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायावर दूरस्थपणे त्यांचे मत देण्याची संधी दिली जाईल. डिमटेरलाइज्ड पध्दत, भौतिक पध्दतीनेमध्ये भाग धारण करणाऱ्या सदस्यांसाठी आणि इमेल पत्ते नोंदणीकृत न केलेल्या सदस्यांसाठी दूरस्थपणे मतदान करण्याची पध्दत सदस्यांच्या सूचनेमध्ये पुरवली जाईल. याचे तपशील या कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध केले जातील. भागधारकांना अशा तपशीलासाठी www.crompton.co.in ला भेट देण्याची विनंती केली जाते.

नोंदीची तारीख - कंपनीने शुक्रवार, ८ जुलै, २०२२ ला नोंदीची तारीख म्हणून निश्चित केली आहे आणि लाभांश घोषित करण्याच्या हेतुसाठी कंपनीच्या सदस्यांची नोंद घेण्यासाठी सदस्यांचे रजिस्टर आणि कंपनीचे भाग हस्तांतर पुस्तके ही शनिवार, ९ जुलै, २०२२ ते शुक्रवार, २२ जुलै, २०२२ (दोन्ही दिवस समावेशक) पर्यंत बंद राहतील. कंपनीच्या भागधारकांच्या मंजुरीला अधीन राहून सोमवार, २५ जुलै, २०२२ ला किंवा त्यानंतर, परंतु वार्षिक सर्वसामान्य सभेच्या तारेखेपासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत कंपनीच्या प्रत्येकी २/- रुपयांच्या सम भागावर प्रत्येकी रु. २.५०/- चा लाभांश प्रदान केला/पाठवला जाईल.

ज्या भागधारकांनी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने भाग धारण केले आहेत त्यांना पत्त्यामधील बदल आणि त्यांच्या संबंधित डिपॉजिटरी सहभागी (डीपी) ला त्यांच्या बँक खाते तपशीलाविषयी अद्यतनाविषयी अधिसूचना निर्देशित करण्याची विनंती केली जाते. ज्या भागधारकांनी भौतिक पध्दतीने भाग धारण केले असतील त्यांना वेळेवर लाभांश मिळवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सिस्टीम (इसीएस)चा विकल्प घेण्याची विनंती केली जाते. आम्ही भागधारकांना लाभांश मिळवण्यासाठी इसीएसचा उपयोग करण्याची विनंती करतो.

बँक खात्याचा तपशील अद्ययावत न केलेल्या भागधारकांसाठी, लाभांश वॉरंट्स/डिमांड ड्राफ्ट/चेक हे पोस्टल सेवांच्या उपलब्धतेवर आधारित नोंदणीकृत पत्त्यावर पाठवले जातील.

इलेक्ट्रॉनिकरित्या लाभांश मिळवण्यासाठी इसीएस आदेशाची नोंदणी करण्याची पध्दत - लाभांश मिळवण्यामध्ये विलंब टाळण्यासाठी, भागधारकांना नाव, फोलिओ क्रमांक, बँक तपशील, पॅन कार्डाची स्वयं-साक्षांकित प्रत आणि रद्द केलेल्या चेकचे पान नमूद करुन स्वाक्षरी केलेल्या पत्राच्या प्रतिसह ISR -1 फॉर्म भरुन त्यांच्या डिपॉजिटरीज (जेथे भाग हे डिमटेरिलाइझ्ड मोडमध्ये धारण केलेले असतील) आणि कंपनीच्या आरटीएसोबत (जेथे भाग हे भौतिक मोडमध्ये धारण केलेले असतील) त्यांच्ये पूर्ण बँक तपशील अद्ययावत करण्याची विनंती केली जाते.

भागधारक नोंद घेऊ शकतात की वित्त कायदा, २०२० द्वारे सुधारित केल्याप्रमाणे आय कर कायदा, १९६१ ("आयटी कायदा") नुसार कंपनीद्वारे १ एप्रिल, २०२० नंतर दिला जाणारा किंवा वितरीत केला जाणारा लाभांश हा भागधारकांच्या हातात करपात्र असतो. त्यामुळे कंपनीला अंतिम लाभांशाचे प्रदान करताना कर सोर्स (टीडीएस) मधून वजा करणे आवश्यक असते. आम्हाला लागू होईल त्याप्रमाणे सुयोग्य टीडीएस दर निश्चित करू देण्यासाठी, भागधारकांना आयटी कायद्याच्या तरतुदींनुसार संबंधित कागदपत्रे सुपुर्द करण्याची विनंती केली जाते.

लागू होणाऱ्या कायद्यांनुसार वेळेमध्ये भागधारकांच्या इमेल पत्त्यावर ८ व्या एजीएमची सूचना पाठवली जाईल.

क्रॉम्पटन ग्रिव्हज् कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडकरिता
सही/-
प्रज्ञा कौल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सभासदत्व क्र. ए१७१६७

स्थान : मुंबई
दिनांक : २३ जून, २०२२

कॅनरा बँक Canara Bank
भारत सरकारचा उपक्रम
सिंडिकेट Syndicate

कफ परेड शाखा : १४ वा मजला, मेकर टॉवर, 'ई' विंग, कफ परेड, मुंबई-४०० ००५.
टेलि. : ०२२ २२१८ ०८७०, २२१८ ६४९७, **ई-मेल :** cb1879@canarabank.com

ताब्यात घेतल्याची सूचना [कलम १३(४)] (अचल मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांची **कॅनरा बँक,** कफ परेड शाखेचे सिक्युरिटायजेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (कायदा क्र. ५४, वर्ष २००२चा) (यापुढे त्याचा उल्लेख ''सदर कायदा'' असा केला आहे) या अन्वये 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून नियुक्ती केली आहे आणि त्यांना या कायद्याच्या कलम १३(१२), ज्याचे सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमावली, २००२ यामधील नियम ०३ यासोबत केले जाते, त्यानुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून एक डिमाण्ड नोटीस **दि. ०७.०४.२०२२** वितरित केली होती आणि त्याद्वारे एक कर्जदार **श्री. झाकिर हुसेन,** फ्लॅट नं. डी/०५, तळमजला, रिलायबल टाऊनशिप (कॉम्प्लेक्स), बोहिडापाडा, राजावाडी वसई, नायगाव लिंक रोड, वसई (पूर्व)-४०१ २०३ यांना सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या रकमेची **₹ १२,६६,६८१.३३ (रुपये बारा लाख सहासष्ट हजार सहाशे एक्क्याऐंशी आणि पैसे तेहतीस मात्र) अधिक त्यावर देय होणारे व्याज आणि इतर खर्च** यांची परतफेड सदर नोटीस मिळाल्याच्या **तारखेपासून ६० दिवसांच्या आत** करण्याचे कळविले होते.

सदर कर्जदार/ हमीदार यांनी या रकमेची परतफेड केली नसल्याने याद्वारे विशेषकरून सदर कर्जदार यांना आणि सामान्यपणे जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांना उपरोक्त कायद्याचे कलम १३(४) ज्याचे सहवाचन उपरोक्त नियमावलीतील नियम ८ आणि ९ सोबत केले जाते; त्यानुसार त्यांना/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **ताबा दि. २२ जून २०२२** या दिवशी **घेतलेला** आहे.

याद्वारे विशेषकरून सदर कर्जदार यांना आणि सामान्यपणे सर्व जनतेला सावध करण्यात येते की, कुणीही या मालमत्तेसंबंधी कोणतेही व्यवहार करू नयेत. तसेच या मालमत्तेसंबंधीचे कोणतेही व्यवहार हे **कॅनरा बँक, कफ परेड** यांची रक्कम **₹ १२,६६,६८१.३३ (रुपये बारा लाख सहासष्ट हजार सहाशे एक्क्याऐंशी आणि पैसे तेहतीस मात्र)** अधिक त्याचे व्याज व इतर खर्च यांच्या आकारणीच्या अधीन असतील.

अचल मालमत्तेचे वर्णन

येथे नमूद केलेल्या मालमत्तेचे सर्व भाग आणि तेथील सर्व काही निवासी फ्लॅट- फ्लॅट नं. ५ हा धारण करणारा, तळमजला, इमारत क्र. २, 'डी' विंग, रिलायबल टाऊनशिप, सी ते के विंग, गाव राजावाडी बोहिडापाडा, वसई पूर्व, जि. पालघर-४०१ २०३, सीएस नं. १०६, १७८/१, १७८/२, १७९ धारणकर्ता, क्षेत्रफळ २८.५९ चौ.मी. कार्पेट एरिया, गहाणकरी- श्री. झाकिर हुसेन, चतुःसीमा बद्धता : उत्तरेला : ट्रिनिटी हायस्कूल अ‍ॅण्ड ज्यु. कॉलेज, **दक्षिणेला :** खुला प्लॉट, **पूर्वेला :** पाल नगर, **पश्चिमेला :** वसई-नायगाव रोड.

दिनांक : २२.०६.२०२२
स्थळ : मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

OBEROI REALTY
ओबेरॉय रिअल्टी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: कॉमर्झ, तिसरा मजला, इंटरनॅशनल बिझनेस पार्क, ओबेरॉय गार्डन सिटी, ऑफ पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई -४०० ०६३
CIN: L45200MH1998PLC114818; **इमेल आयडी:** cs@oberoirealty.com;
वेबसाईट: www.oberoirealty.com; **टेलीफोन क्र:** +९१ २२६६७७ ३३३३, **फॅक्स:** + ९१ २२६६७७ ३३३४

सूचना

वार्षिक सर्वसाधारण सभा आणि वार्षिक अहवाल

कंपनीच्या सभासदांची २४वी वार्षिक सर्वसाधारण सभा (**'एजीएम'**) शुक्रवार, १५ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सभेसंबंधीच्या सूचनेत (**'सूचना'**) नमूद केलेल्या कामकाजासाठी कंपनी कायदा २०१३ मधील लागू तरतुदी व भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्ड (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ सहवाचित कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे वितरीत साधारण परिपत्रके क्र १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२० आणि ०२/२०२२ आणि भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्डाद्वारे वितरीत परिपत्रके क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२२/६२ (यापुढे सामुदायिकरित्या **'उपरोक्त परिपत्रके'** म्हणून संबोधित) यांच्या अनुपालनार्थ व्हिडीओ कॉन्फरंसिंग/अन्य दृक श्राव्य माध्यमातून (**'व्हिसी'**) कंपनीच्या सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय आयोजित करण्यात आली आहे. उपरोक्त परिपत्रकांच्या अनुपालनार्थ कंपनीचे आर्थिक वर्ष २०२१-२२ चे वार्षिक अहवाल (संचालक अहवाल, लेखापरीक्षक अहवाल आणि वित्तीय विवरणपत्रे यांसह) तसेच सूचना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सभासदांना पाठविण्यात आलेले आहेत ज्यांचे इमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीजकडे नोंदविलेले आहेत. उपरोक्त दस्तावेज कंपनीची वेबसाईट (**www.oberoirealty.com**) येथे तसेच बीएसई लिमिटेड (**www.bseindia.com**) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**www.nseindia.com**) यांसारख्या स्टॉक एक्स्चेंज वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेले आहेत. अशा कोणत्याही दस्तावेजांची भौतिक स्वरूपाची प्रत सदस्यांना हवी असल्यास तशी मागणीची विनंती ते करू शकतात.

ज्या सभासदांनी अद्याप आपले इमेल पत्ते नोंदविलेले नाहीत त्यांनी इमेलद्वारे दस्तावेज मिळविण्यासाठी कृपया आपल्या इमेल पत्त्यांची नोंदणी करावी ; असे सभासद पुढील तपशील (ए) फोलिओक्र/डिमॅट खाते क्र (बी) तुमचा इमेल पत्ता (सी) (१) शेअर सर्टिफिकेटची (पुढील व मागील बाजू)/क्लायंट मास्टर किंवा एकत्रित अकाऊंट स्टेटमेंटची प्रत (२) पॅनकार्डची स्वसाक्षांकित प्रत व (३) आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत यांच्या स्कॅन प्रती (cs@oberoirealty.com) या ठिकाणी पाठवून त्यांची लॉगीन प्रमाणपत्रे मिळवू शकतात. भौतिक स्वरूपातील समभागांसाठी कंपनी वरील माहितीच्या आधारावर इमेल पत्ते अद्ययावत करेल. डिमॅट स्वरूपातील समभाग धारण करणाऱ्या सभासदांनी कृपया त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपेंटसकडे त्यांचे इमेल पत्ते अद्ययावत करावेत. सभासदांना विनंती आहे की त्यांनी आपल्या फोलिओ/ डिमॅट खाते, जे लागू असेल त्याप्रमाणे, यामध्ये आपले इमेल पत्ते अद्ययावत ठेवावेत.

ज्या सभासदांना लेखापालन आणि व्यवहार याविषयीची कोणतीही माहिती जाणून घेण्याची इच्छा असल्यास त्यांनी कृपया त्यांच्या शंका **cs@oberoirealty.com** या इमेल पत्त्यावर एजीएमपूर्वी किमान कामकाजाचे ७ दिवस आधी पाठवाव्यात जेणेकरून कंपनी एजीएममध्ये / इमेलद्वारे अशा शंकांचे योग्य निरसन करू शकेल.

इ-मतदान माहिती

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि त्या अंतर्गत बनविलेले नियम, भारतीय सिक्युरिटीज व एक्स्चेंज बोर्ड (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ चा अधिनियम ४४ सहवाचित उपरोक्त परिपत्रके यांनुसार सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर एजीएमपूर्वी (दूरस्थ इ-मतदान) व एजीएम दरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा कंपनी आपल्या सभासदांना पुरवित आहे. कंपनीने इ-मतदान सुविधा पुरविण्यासाठी सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांची नियुक्ती केली आहे. इ-मतदानासंबंधी सूचनांच्या तपशीलासाठी कृपया सूचनेचा संदर्भ पाहावा. ही सूचना सीडीएसएलची इ-मतदान वेबसाईट **www.evotingindia.com** येथे देखील उपलब्ध आहे.

दूरस्थ इ-मतदानाची सुरुवात १२ जुलै २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरु होईल आणि १४ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संपेल. दूरस्थ इ-मतदान यंत्रणा सीडीएसएलद्वारे १४ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर निःसमर्थ केली जाईल. दूरस्थ इ-मतदानाची पात्रता ठरविण्याची निर्णायक तारीख ०८ जुलै २०२२ असेल आणि ज्या व्यक्तीने या निर्णायक तारखेस कंपनीचे समभाग (भौतिक किंवा डीमटेरीअलाइज्ड स्वरूपात) धारण केलेले असतील अशीच व्यक्ती इ-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल. एजीएम सूचनेचे वितरण झाल्यानंतर जी कोणतीही व्यक्ती कंपनीचे समभाग प्राप्त करेल, आणि कंपनीची सभासद होईल तसेच निर्णायक तारखेस म्हणजेच ०८ जुलै २०२२ रोजी भागधारणा करीत असेल, अशा व्यक्तीने लॉगीन आयडी आणि पासवर्ड मिळविण्यासाठी सूचनेत नमूद केलेली प्रक्रिया पार पाडावी. ज्या सभासदांनी आपले मत दूरस्थ इ-मतदानाद्वारे एजीएमपूर्वी दिलेले नसेल त्यांनाच एजीएम दरम्यान इ-मतदानाद्वारे मतदानाची अनुमती आहे. ज्या सभासदांनी आपले मत दूरस्थ इ मतदानाद्वारे एजीएमपूर्वीच दिलेले असेल तेदेखील व्हिसीद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु ते एजीएममध्ये मत देण्यास अपात्र असतील.

जर तुम्हाला व्हीसी सुविधेबाबत सभेपूर्वी किंवा सभेदरम्यान किंवा सीडीएसएल इ-मतदान यंत्रणेविषयी कोणतीही शंका किंवा समस्या असल्यास किंवा काही सहाय्य आवश्यक असल्यास, तुम्ही **helpdesk.evoting@cdslindia.com** येथे ईमेल पाठवू शकता किंवा सीडीएसएल यांच्याशी +९१ २२ २३०५८७३८/८५४२ या क्रमांकावर संपर्क साधू शकता. वैकल्पिकरित्या, ई-मतदानाविषयी समस्या निवारणासाठी श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक, सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरॅथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०००१३ येथे पाठवू शकता किंवा **helpdesk.evoting@cdslindia.com** येथे इमेल करू शकता किंवा १८०० २२ ५५ ३३ येथे संपर्क साधू शकता.

रेकॉर्ड डेट

याशिवाय याद्वारे सूचित करण्यात येत आहे की ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी समभागांवर लाभांशाचे वाटप करण्यासाठी रेकॉर्ड डेट ८ जुलै, २०२२ ही आहे. त्यानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी मिळाल्यास, संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार प्रत्येक समभागास रु. ३/- एवढ्या लाभांशाचे वाटप ज्या सभासदांची नावे ८ जुलै, २०२२ रोजी दिवस अखेरीस रजिस्टर ऑफ मेंबर्समध्ये दिसून येत असतील, त्यांना करण्यात येईल.

स्थळ: मुंबई
दिनांक: २३ जून २०२२

ओबेरॉय रिअल्टी लिमिटेड करिता
भास्कर क्षीरसागर
कंपनी सचिव

अर्थ सुसंगती अथवा अन्य कोणत्याही हेतूसाठी या सूचनेचे २४ जून, २०२२ रोजी फायनांशियल एक्सप्रेस मधील इंग्रजी रूपांतरण हे अंतिम समजण्यात येईल.